# University of Mumbai

अत्यंत महत्त्वाचे

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२

Email : supt.statunit@gmail.com

शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी
(सांख्यिकी कक्ष)
खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

**No. UDSTAT/ICD/2023-24/ 674 of 2023**

दिनांक : १७ ऑगस्ट, २०२३

प्रति,
प्राचार्य/संचालक,

विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सन २०२२-२३ संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करणेबाबत. **(www.aishe.gov.in)**

संदर्भ : १. मा. शिक्षण संचालक (उ.शि.), पुणे, यांचे क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२२-२३/१३८०१, दिनांक २२/११/२०२२ रोजीचे पत्र.
२. मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.), पुणे, यांचे क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२३-२४/५४७५, दिनांक ०२/०५/२०२३ रोजीचे पत्र.

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय पत्रानुसार आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांचाकडून AISHE - अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०११-१२ पासुन सुरू करण्यात आलेला आहे. सर्व महाविद्यालयांना AISHE बाबतची माहिती ऑनलाईन सादर करणे अनिवार्य आहे.

तद्अनुषंगाने आपणांस असे कळविण्यात येते की, सन २०२२-२३ करीता आपल्या महाविद्यालयाकडून बेबपोर्टलवर अद्यापर्यंत नोंदणी (Registration) करण्यात आलेली नाही अथवा केलेली नोंदणी अपरीपुर्ण माहिती अभावी नाकारण्यात (Reject) आलेली आहे. तसेच स्कॉलरशीप, नॅक व इतर कामासाठी AISHE बाबतच्या प्रमाणपत्राची महाविद्यालयांना आवश्यकता असल्यामुळे माहिती वेळेत सादर करणे बंधनकारक आहे व त्याकरीता नोंदणी (Registration) करून घेणे अत्यंत अनिवार्य आहे.

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील संबंधित सर्वेक्षणात्मक कामकाजासाठी एक नोडल अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक आहे. नोंदणी करतेवेळी नेमणूक केलेल्या नोडल अधिका-याचे संपुर्ण नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी इ. बाबतची माहिती सादर करावी, तसेच शासन निर्णय (GR), सलंग्निकरणाचे पत्र (Affiliation Letter) व इतर महत्वपुर्ण मान्यता पत्र एकत्रित स्वरूपात ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. नोंदणी झाल्यानंतर आपणांस Request ID प्राप्त होईल व त्याचा मान्यतेकरीता (Approval) उपकुलसचिव, शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष), खोली क्र. २०२, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई-४०००३२, येथे बुधवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ पर्यंत संर्पक साधवा.

सबब सन २०२२-२३ करीता माहिती सादर करण्याबाबतचे कामकाज लवकरच चालू होणार असल्याने तातडीने नोंदणी (Registration) करण्यात यावी व याबाबत महाविद्यालयाने आवश्यक ती कार्यवाही न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची नोंद असावी.

**टिप्पणी :** १. नोंदणीकरीता **www.aishe.gov.in** या बेबसाईट वर जावून **Request for Adding Institute** लिंक वर क्लिक करून उल्लेखित माहिती भरावी व सोबत शासन निर्णय (GR), सलंग्निकरणाचे पत्र (University Affiliation Letter) व इतर महत्वपुर्ण मान्यता पत्र एकत्रित स्वरूपात वेबपोर्टलवर जोडण्यात यावी.

२. नोंदणी झाल्यानंतर आपणांस **Request ID** प्राप्त होईल व त्याची सद्यस्थिती वेबसाईट मधील **Track your Request ID** वर क्लिक करून त्याबाबतचा पाठपुरावा करावा.

(प्रा. सुनील भिरूड)
प्रभारी कुलसचिव